REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2024

# सर्व कार्येषु सर्वदा

श्रीमती विजया बबन बनसोडे
एम. ए. मराठी. सेट, नेट
वडूज, जिल्हा सातारा.



सुखकर्ता दुखहर्ता, अश्या श्री गणेशाची स्थापना भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील गणेश चतुर्थीला केली जाते. सर्वात प्रसिध्द आणि सर्वाधिक पुजनीय देवतांपैकी एक देवता म्हणजे श्री गणेश. कोणत्याही कार्याची नविन सुरुवात करत असताना श्री गणेशाची आराधना, पुजा केली जाते. श्री गणेश हा अक्षरे आणि शिक्षणाचा, विद्येचा आश्रयदाता आहे. विघ्नहर्ता म्हणजे अडथळा दूर करणारा म्हणूनही तो लोकप्रिय आहे.

गणेश चतुर्थी पासून सुरु होणारा हा वार्षिक उत्सव दहा दिवसांचा असतो. श्री गणेशाची मातीची मुर्ती आणून उत्सवाची सुरुवात होते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी या उत्सवाची सांगता होते. दहा दिवसांच्या उत्सवामध्ये सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण असते. घरोघरी स्वच्छता करुन, सजावट करुन श्री गणेशाच्या मुर्तीची स्थापना केली जाते. सकाळी संध्याकाळी श्री गणेशाची पुजा करुन, आरती केली जाते. मोदकांचा नैवैद्य अर्पण केला जातो. गणपतीची फक्त भक्ती करणे, पुजा अर्चना करणे एवढच आपण करु शकतो का ? गणपतीच्या रुपापासून आपण काही प्रेरणा नाही का घेऊ शकत? त्यांची शक्ती आपल्या जीवनामध्ये आणण्याचा प्रयत्न करुन, केवळ श्री गणेशाची पुजा करण्यापेक्षा आपण स्वत:च श्री गणेश का होऊ नये ?

श्री गणेशाच्या जन्माची कहाणी आपल्याला खुप काही शिकवून जाते. अस म्हणतात की श्री शंकर तपस्या करण्यासाठी दूर पर्वतावर निघून गेले होते. त्यावेळी माता पार्वतीने आपल्या शरिराच्या मळापासून एका बालकाची निर्मिती केली. एके दिवशी पार्वती माता आंघोळीसाठी निघाली, तेंव्हा तिने गणेशाला घराच्या बाहेर पहारा देण्यासाठी उभे केले. ती आंघोळ करुन येईपर्यंत बाहेरुन कुणीही आले तरी त्याला घरामध्ये प्रवेश दयायचा नाही अशी ताकीद केली. त्याचवेळी श्री शंकर तपस्या करुन घरी आले. श्री गणेशाने त्यांना घरामध्ये जाण्यास मनाई केली. त्याचेही बरोबरच होते, तो आपल्या वडीलांना ओळखत नव्हता आणि आपल्या आईच्या आदेशाचे तो पालन करीत होता. अस म्हणतात की, घरामध्ये प्रवेश दिला नाही म्हणून श्री शंकराला खुप राग

आला आणि त्यांनी त्या बालकाचे डोके कापले. त्याचवेळी माता पार्वती आंघोळ करुन परत आली आणि पहाते तर काय श्री शंकराने आपल्याच मुलाचे धड शरीरापासून वेगळे केले. माता पार्वतीने आपल्या मुलासाठी आक्रोश करायला सुरुवात केली, त्यावेळी श्री शंकर म्हणाले, ठिक आहे, आता इथून जो कोणी पहिला येईल त्याचे डोके या मुलाल देऊन जिवंत करु. सगळयात प्रथम जो आला तो हत्ती होता. तेंव्हा श्री शंकरांनी हत्ती डोके कापले आणि आपल्या मुलाला देऊन जिंवत केले.

हि कहाणी आपण खुप पुर्वीपासून ऐकत आलेलो आहे. पण आपण कधी याचा खोलवर विचार केला नाही. तर ही कथा आपल्याला काय सांगून जाते, की एक मुल आपल्या वडीलांना ओळखत नाही. श्री शंकर पर्वतावर जाऊन कठोर तपस्या करुन आलेले असताना त्यांच्यामध्ये इतका प्रचंड राग असेल का ? सर्वसामान्य माणसांनी दहा-पंधरा मिनीटे जरी ध्यान केले तरी बऱ्याच प्रमाणात तो शांत होतो, चिडचिड कमी होते. मग हे तर साक्षात ईश्वर, श्री शंकर होते, आणि तपस्या करुन आलेले असताना त्यांनी रागाच्या भरात आपल्या मुलाचे डोके उडविले. बर या घटनेला असे कधीही म्हणत नाहीत की श्री शंकराने आपल्या मुलाची हत्या केली, तर असेच म्हणतात की श्री शंकराने मुलाचे डोके कापले. असं पाहिल तर कुणाचही डोकं कापल तर तो मरुन जाईल म्हणजेच त्याची हत्याच होईल. पण इथ असं म्हटल जात नाही. डोके कापणे आणि हत्या करणे यामध्ये सुक्ष्मदृष्टया खुप फरक आहे. मुलाच डोकं कापल आणि दुसऱ्या कुणाच तरी डोकं लावून त्याला जिवंत केल. म्हणजेच डोक कापून अहंकाराला दूर केल आणि नविन डोके लावून, नव्याने जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन मिळाला. नविन डोक लावण्याच कारण आपल्या अहंकारामुळे आपण साक्षात ईश्वराला सुध्दा ओळखत नाही.

माता पार्वतीने आपल्या शरिराच्या मळापासून मुलाची निर्मिती केली अस म्हणतात. खरच माता पार्वती देवी असून तिच्या शरिरावर इतका मळ होता की, त्यापासून तीने एका मुलाची निर्मिती केली. माणसाच्या शरिरावर इतका मळ आहे का, की ते त्यापासून एका मुलाची निर्मिती करतील ? मळापासून मुलाची निर्मिती केली याचा अर्थ हे शरीर मातीपासून बनलेले आहे. ईश्वर आपल्या शरिरावर असलेल्या अहंकाराला नष्ट करण्यासाठी प्रथम डोक्यापासून सुरुवात करतात. श्री शंकरांनी प्रथम त्या मुलाचे डोके कापले, म्हणजे अहंकार नष्ट केला. नविन डोके लावून त्याला जिवंत केले, म्हणजे त्याला ज्ञानाने परिपुर्ण, शुध्द सात्विक असे डोके लावले. बरं, त्या मुलाचे डोके कापलेच होते, तर तेच डोके लावले असते तर अजून एका प्राण्याची हत्या करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु ईश्वर आपल्या अहंकाराला नष्ट करतात तेंव्हा त्याच्या जागी सात्विक, प्रेमळ, आध्यात्मिक, ज्ञानी असे नविन जीवन देतात. म्हणजेच मनुष्याच्या अहंकाराचा संपुर्णपणे नाश करुन, नविन शुध्दा सात्विक मनुष्याची निर्मिती करतात. श्री शंकरानी तेच केले आणि त्यांचे नांव ठेवले श्री गणेश.

श्री गणेशाच्या एका एका अवयवाचे सुक्ष्मपणे निरीक्षण केले तर ते आपल्याला योग्य जीवन जगण्याची कला आणि ज्ञानासोबत आयुष्य कसे जगायचे हेच शिकवून जातात. प्रथम आपण श्री गणेशाच्या डोक्यापासून सुरुवात करु. श्री गणेशाचे डोके मोठे आहे, म्हणजेच शहाणपण आणि तीक्ष्ण बुध्दी याचे प्रतिक आहे. डोके एवढे मोठे आणि डोळे एकदम बारीक. एखादी गोष्ट करण्यापुर्वी एकदम सुक्ष्मपणे, बारकाईने पहाणे, म्हणजेच दुरवर विचार करणे. म्हणजेच एखादया गोष्टीवर विचार करुन, परिणामांचा विचार करुनच कृती करणे.

तोंड बारीक म्हणजेच कमी बोलणे. कान मोठे म्हणजे जास्तीत जास्त ऐकणे. (Talk Less and Lissan More). कान फक्त मोठेच नाहीत तर सुपासारखे मोठे. सुप काय करत, तर सफाई करण्याचं काम करत. योग्य तेच घ्याव आणि नको असेल ते सोडून दयाव. म्हटल जात एका कानाने ऐकाव, आणि दुसऱ्या कानाने सोडून दयाव. पण असं होत नाही, कारण एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडत असताना मध्ये येते ती बुध्दी. प्रत्येक गोष्टीचा, घटनेचा या बुध्दीवर खोलवर परिणाम होत असतो. त्यामुळे नको असलेल ऐकायचच नाही. आजकाल प्रसार माध्यमांव्दारे, आजूबाजूच्या लोकांच्याव्दारे, आपण खुप काही चांगले वाईट ऐकत असतो. त्याचा परिणाम आपल्या जीवनावर होत असतो. म्हणून केवळ थोर व्यक्तींचे चरित्र, चांगल्या घटनांची माहिती, प्रेक्षणीय, ऐतिहासिक स्थळ अशाच महत्वाच्या गोष्टी ऐकण्याचा निर्धार करावा. कमी बोलावे आणि जास्त ऐकावे.

श्री गणेशाचे दोन दात आहेत, पण एक तुटलेला आहे, म्हणून त्याला एकदंत म्हणतात. मनुष्य जीवनामध्ये सतत व्दैत आहे. व्दैत म्हणजे दोन. स्त्री-पुरुष, लहान मोठा, गरीब श्रीमंत, जाती धर्मामध्ये सगळीकडेच व्दैत आहे. ईश्वर जेंव्हा ज्ञान देतात तेंव्हा एकच शिकवतात, सगळे एकच आहेत, प्रत्येकामध्ये एकच आत्मा आहे, आणि मनुष्य ईश्वराचा अंश आहे. (जो मैं हुँ, वो तुम हो) हे विश्वची माझे घर. त्यामुळेच व्दैत संपवण्यासाठी एकच दात, म्हणजे एक दंत.

श्री गणेशाची सोंड. सोंडेची विशेषता अशी की ती मोठया झाडाला सुध्दा मुळापासून उपटून टाकते आणि तीच सोंड एका लहान गवताची काडी सुध्दा प्रेमाने उचलते. म्हणजेच सोंडेचा उपयोग हा प्रेमळ आणि शक्तीशाली असे संतुलन दाखवते. म्हणजे जे आध्यात्मिक, ज्ञानी होतील ते खुप प्रेमळ, सात्वीक होतील आणि शक्तीशाली होती. कधी कधी असे वाटते की अध्यात्मिक म्हणजे आपण दुर्बल होऊ. आपण खुप साधे आणि सरळ असू तर लोक आपल्याला धोका देऊन पुढे निघून जातील, परंतु असे नाही, आध्यात्मिक म्हणजे शांत, सरळ, प्रेमळ परंतु शक्तीशाली, शहाणे, दुरदृष्टीवाले.

श्री गणेशाचे पोट. इतर देवी देवतांना पाहिल तर त्यांच शरीर एकदम मजबूत आणि प्रमाणशीर असते. गणेशाचे पोट खुप मोठे आहे. जे शहाणे असतात ते आपल्या पोटामध्ये सगळ साठवून ठेवतात. एखादा व्यक्ती सगळयांना काही ना काही सांगत असतो तेंव्हा अस म्हणतात की याच्या पोटामध्ये काहीच रहात नाही. श्री गणेशाचे पोट मोठे आहे म्हणजे ते सगळया गोष्टी आपल्यामध्ये सामावून घेतात. इकडून ऐकून तिकडे सांगितले असे करत नाही. मोठे पोट हे सगळ स्विकार करण्याचे प्रतिक आहे. सगळयांना भेटा, काम करा, प्रत्येकाचे संस्कार वेगळे आहेत. सगळयांचा स्विकार करुन आपले काम करत रहा.

श्री गणेशाला चार हात आहेत. प्रत्येक हातामध्ये वेगळेवेगळे अलंकार/आयुधे आहेत. एका हातामध्ये कुऱ्हाड आहे. कुऱ्हाडीने आपले विकार, नकारात्मकता, आपले पुर्व कर्म तोडून टाकून संपवणे. केवळ सकारात्मक दृष्टीने वागणे, आणि प्रेम भावना ठेवणे.

दुसऱ्या हातात रस्सी/दोर (पाश) आहे. ज्ञान घेतले, ध्यान केले, परंतु त्यांची अंमलबजावणी तेंव्हा होईल जेंव्हा जीवनामध्ये शिस्त असेल. शिस्त, संयम, नियम यांनेच जीवन सुखी होईल. जीवनामध्ये मर्यादा

असल्या पाहिजेत. कधीही उठा, काहीही खा, कुणाला काही बोला, कुठेही जा असे करणे नियमाला धरुन नाही. असा मनुष्य शहाणा होत नाही. ही रस्सी/दोर (पाश) म्हणजे मर्यादेमध्ये रहाणे, मर्यादांचे पालन करणे.

तिसरा हात आशिर्वादासाठी आहे. आपण बघतो आपण सतत हात पुढे करत असतो, प्रत्येकाकाडून आपल्याला काही ना काही पाहीजे असते. अगदीच काही नाही तरी, कुणीतरी चांगले बोलावे, आपले गुणगान करावे, मानसन्मान मिळावा, प्रेम मिळावे, वस्तू पाहिजे, दागिने पाहिजे म्हणजे सगळ पाहिजेच पाहिजे. परंतु, श्री गणेशाचा हात आशिर्वादासाठी वर आहे, त्यात मागणी नाही, केवळ देण्याचा भाव आहे. देण्यामध्येच सुख आहे.

चौथ्या हातामध्ये मोदक आहे. मोद म्हणजे आनंद, हर्ष. मोदक म्हणजे ज्ञानाच्या सहाय्याने आपल्या जीवनामध्ये आनंद आणणे. ज्ञान ग्रहण करुन त्याचा जीवनामध्ये अवलंब करण्यासाठी खुप एकाग्रता असणे आवश्यक आहे. मोदक बनवायला खुप मेहनत लागते. परंतु एकदा ती मेहनत घेतली तर कष्टाचे फळ गोडच असते. हे सगळ केल्यानंतर सुख मिळेल, यश मिळेल, नाव होईल, लोक चांगल म्हणतील परंतु हे सगळ मिळाल की अहंकार आपोआपच येणार. म्हणजे मोदक बनला, गोड पण आहे, परंतु सोबत अहंकार घेऊन येणार आहे. परंतु श्री गणेश मोदक फक्त हातात घेतात, खात नाहीत. म्हणजेच काही झाल तरी अहंकार आपल्यामध्ये आला नाही पहिजे. सगळया अहंकारामध्ये ज्ञानाचा अहंकार सगळयात मोठा आणि अतिसुक्ष्म आहे जो कळतही नाही की तो अंहकार आहे.

श्री गणेश बसलेले दाखवतात. एक पाय दुमडलेला असतो, दुसरा पाय उभा असतो, उभ्या पायाचा फक्त एकच अंगठा टेकवलेला असतो. म्हणजेच या दुनियेत रहायच असेल तर पाय जमिनीवर पाहिजेत. सगळयांच्या मध्ये रहायचय, संगळयांना प्रेम दयायच, काम कराचय, सगळी नाती सांभाळायची, म्हणजे दिलेली जबाबदारी पुर्ण करायची. सगळयांच्यात रहायच पण सगळयामधून वेगळ ही रहायचय. म्हणजे न्यारे और प्यारे असं रहाता आल पाहिजे.

अस असून सुध्दा श्री गणेशाचे वाहन काय आहे ? तर उंदीर . उंदीर कशाचे प्रतिक आहे तर चंचलता. उंदीर सतत काहीतरी कुरतडत असतात. खाण्याची वस्तू नसली तरी, कधी वायर, कधी कागद, कधी कापड, म्हणजे जे मिळेल ते कुरतडत असतात. हे सगळ आपल्या कर्मेंद्रियांच प्रतिक आहे. आपण इंद्रियांव्दारे काहीही बघतो, काहीही ऐकतो, काही करतो. उंदरा प्रमाणे कर्मेंद्रियांवरील आपला संयम संपला आहे. दुसर असं की उंदीर खुप लहान जागेमधून घरामध्ये येतो. दारे खिडक्या बंद असल्या तरी आतमध्ये येतो. तसेच, विकार सुध्दा अतिशय सुक्ष्मपणे आपल्यामध्ये इंद्रियांव्दारे येत असतात. कमजोरी, लाचारी, दु:ख, लक्ष विचलीत होणे हे जीवनामध्ये आलेले कळतही नाही. उंदीर जेंव्हा चावतो तेंव्हा काहीही संवेदना होत नाहीत, खुप उशीरा चावल्याच जाणवत, मग त्यापासून त्रास व्हायला सुरुवात होते. तसच, इंद्रियांव्दारे आलेले विकार सुध्दा आपल्या आयुष्यामध्ये कधी आले, त्यांनी आपल्या जीवनाचा ताबा कधी घेतला हे कळतही नाही. जेंव्हा कळते तेंव्हा खुप उशीर झालेला असतो. म्हणूनच विशाल बुध्दी, दुरदृष्टी, शहाणपण, नियम पाळणे, वाईट गोष्टी टाळणे, चांगले ऐकणे, कमी बोलणे, प्रेमळ आणि शक्तीशाली असणे, गोष्टी पोटामध्ये ठेवणे, ज्ञानामध्ये जगणे, विकार होऊ न

देणे, आशिर्वाद देणे, असे मनुष्यत्वामध्ये राहू तेंव्हा आपण आपल्या सर्व इंद्रियांवर विजय मिळवू. म्हणून गणेश उंदरावर बसलेले दाखवतात.

श्री गणेशाबरोबर रिध्दी आणि सिध्दी असतात. श्री गणेशाच्या दोन पत्नी. ज्या नेहमी श्री गणेशाच्या सोबत असतात. आध्यात्मिक जीवनामध्ये समृध्दी आणि यश आपोआप येतात. त्यासाठी धावपळ, मेहनत, करण्याची गरज पडत नाही. आज आपण सुख मिळविण्यासाठी खुप धावपळ करत आहोत. संपुर्ण जग फक्त धावत आहे. प्रत्येकाने ईश्वरासोबत संबंध जोडले की आपोआपच सुख, समृध्दी, आनंद, यश, धन, संपत्ती, येत असतात. त्यामुळे श्री गणेशाची फक्त पुजा न करता त्यांच्या एकेक विशेष गुण आपल्या जीवनामध्ये अंगीकारल्यास जीवन सुखी, समृध्द होईल. म्हणूनच श्री गणेशाची पुजा करण्यापेक्षा आपले आयुष्य श्री गणेशा सारखे विशाल बुध्दी, दुरदृष्टी, विघ्नविनाशक, भाव प्रेमळ, सगळयांना सामावून घेणारे, सतत कार्यमग्न, शक्तीशाली बनायच आहे. हिच खरी श्री गणेशाची आराधना, पुजा होईल.